# " होळी "

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला होळीकोत्सव साजरा करतात. त्या उत्सवामागे असलेली कथा सर्वांना माहीतच आहे. हिरण्यकश्यपू नावाचा एक राक्षस राजा होता. त्याला सर्वत्र हिरण्य म्हणजे सोनेच दिसत होते. त्याच्या जीवनाचा उद्देशच मुळी भोग भोगणे होता. खा, प्या, मजा करा अशा वृत्तीचे राक्षस असतातच. तो स्वतःलाच ईश्वर समजायचा. प्रजेने आपलाच उदो उदो करावा, आपली आरती ओवाळावी असे कायदे त्याने केले. ईश्वराला मानणाऱ्यांना तो कडक शासन करत असे.

चिखलात जसे कमळ तसेच त्याच्या घरात प्रल्हाद सारखा भक्त पुत्र म्हणून जन्माला. त्याच्या जन्माच्या आधी त्याची आई कयाधू नारदाच्या आश्रमात राहयली होती. त्या संस्कारांमुळे प्रल्हादाचे अंतःकरण भगवद्भक्तीने भरले होते. त्याच्या वडिलांनी त्याचे हृदयपरीवर्तन करण्याचे खूप प्रयत्न केले, त्यात ते असमर्थ ठरले. मग तर त्याला मारण्याचे प्रयत्न केले, अग्नीत फेकून देणे, कड्यावरून ढकलून देणे, उकळत्या तेलात टाकणे इ.

प्रल्हादाच्या आत्याला होळीकेला वरदान होते की तिने जर सद्वृत्तीच्या माणसाला त्रास दिला नाही तर अग्नी तिला जाळणार नाही. भावाच्या आग्रहाला बळी पडून होळीकेने प्रल्हादाला मांडीवर घेवून बसायचे कबूल केले. परीणाम व्हायचा तोच झाला. होळीका जळून भस्म झाली आणि सद्वृत्तीचा ईश्वरनिष्ठ प्रल्हाद हसत खेळत बाहेर आला. यावरून जगात अल्पसंख्य का होईना सत्प्रवृत्तीचे लोक असतात ते प्रभुनिष्ठ असल्यामुळे असद्वृत्ती त्यांना ग्रासु शकत नाही, असा संदेश होळीचा उत्सव आपल्याला देतो.

हजारो वर्षांपासून आपण होळीचे पूजन यासाठी करतो की, ज्या दिवशी होळीका प्रल्हादाला घेवून अग्नीमध्ये बसणार होती त्या दिवशी नगरातील सर्व लोकांनी घराघरात अग्नी प्रज्वलीत करून त्याने प्रल्हादाला जाळू नये यासाठी त्याची प्रार्थना केली होती. अग्नीने लोकांच्या शुध्द अंतःकरणातील प्रार्थना स्विकारली आणि अग्नीदिव्यातून पार उतरलेला बाळ प्रल्हाद नरश्रेष्ठ बनला. घराघरातील अग्नीपूजा कालक्रमामध्ये सामुदायिक पूजेत रूपांतरीत झाली म्हणूनच

होळीकापूजन हे असद्वृत्तीच्या नाशासाठी तसेच सद्वृत्तीच्या रक्षणासाठी लोकांच्या हृदयात असलेल्या शुभ भावनांचे प्रतीक आहे. आणि म्हणून आपण होळी उत्सवाचे स्वागत करतो. आनंदाच्या वातावरणाने रंगीत बनलेले लोक एकमेकांवर रंग, गुलाल उधळू लागले. काहींनी धूळ उडवायला सुरवात केली. त्यामुळे धुळवट निर्माण झाली. लहान-मोठे-गरीब-श्रीमंत सगळे एकत्र येवून नाचू-गाऊ लागले.

होळीमध्ये केवळ निकामी वस्तू / कचराच जाळला पाहिजे असे नाही तर मनाचा मळही जाळायला हवा. आजकाल होळीला थोडे विघातक रूप दिसून येते. सार्वजनिक स्तरातील लोकांच्या संस्कारांचे संमिश्रण बघायला मिळते.

थोडक्यात काय तर होळीचा सण फाल्गुनाच्या रंगाने आपले जीवन रंगीन बनवणारा, वसंतातही संयमाची दिशा देणारा, संघनिष्ठेचा महिमा समजवणारा व मनात / समाजात असलेल्या असद्वृत्तींना जाळण्याचा संदेश देणारा उत्सव आहे.

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी
मोबा - ९३०८६९५७५१



58